FORM-I A | N.C.R.B.
I.I.F.-1

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत

# पहिली खबर

(Under Section 173 B.N.S.S.-2023)

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: लाo प्रo वि, पहिली खबर क्र. FIR No.: 01, वर्ष Year: 2024, दिनांक Date: 3/09/24
2. (i) अधिनियम Act: भ्र.प्र.अधि.१९८८, कलमे Sections: 07
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........
3. (a) अपराधाचा घटना : Occurrence of offence : वार Day: गुरुवार, तारीख पासून Date from: 12/12/28, वेळ Time ..........., तारीख पर्यंत Date to: 02/09/24, वेळ Time: 10:45 वा.

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date: 31/12/2028, वेळ Time ...........

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 01/24, तारीख Date: 03/09/2024, वेळ Time: 06:00 वा.
4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...........
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ..........., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ...........

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: भारत रेस्टॉरंट स्टोअर्स, ठिकाणाचे नंबर No. if any: अंधेरी स्थानक (प) मुंबई, प्रभाग Ward ..........., रस्त्याचे नाव Name of road ...........

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place: अंधेरी स्थानक मुंबई, गाव Village ..........., पोस्ट Post ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ...........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ...........
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name: अमोदकुमार सिपाहीलाल वाल्मिकी (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name ...........

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: ४३ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: 9594262607

   (e) पारपत्र क्रमांक Passport No.: - , दिल्याचा दिनांक Date of Issue ..........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..........., (f) व्यवसाय Occupation ...........

   (g) धर्म Religion: हिंदु, जात Caste ..........., जनजात Sub-Caste: -

   (h) पत्ता Address: रू.नं. 493, बिल्डिंग नं. 02, [illegible], एस.आर.ए. प्रोजेक्ट चेंबूर मुंबई 88
   Ward, House/Name No., Phone/M. No., Par No., Card No.

   रस्त्याचे नाव Road ..........., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..........., गाव Village ..........., पोस्ट Post ..........., पो. स्टे. P. Stn. ...........

   तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ..........., सध्याचा पत्ता Present Address ...........
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form I-B of attach FIR I-B to case diary.)

   सतिश पित्या जाधव, वय ५५ वर्षे, धंदा: नोकरी, पद-मुकादम म.न.पा.कार्यालय, के/वेस्ट, अंधेरी मुंबई
   रा.ठि. सेनटेक्स टॉवर "१ सी" विंग, फ्लॅट नं. ६०६, दवा माळी नायगांव (पुर्व) ता. वसई.
   जि. पालघर. मो.नं. ८८५०९७६३६८

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी ~~श्री.~~ अमोदकुमार सिपहरलाल वाल्मिकी वय ४३ वर्षे, धंदा - नोकरी. रा.ठी. ४१३, बि.नं. ७२, माहुलगाव, एसआरए प्रोजेक्ट, चेंबूर, मुंबई-७४. यांचा स्वतंत्र पानावर जबाब नोंद करण्यात आला असून, त्यास नमुद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष
Pkalal
PI ACB
(पदुमावती कलाल)
पोलीस निरीक्षक
लाप्रवि मुंबई.

[signature]

जबाब दिनांक ०२/०१/२०२४

अमोदकुमार सिपट्टरलाल वाल्मिकी,वय ४३ वर्षे, धंदा- नोकरी (सिक्युरीटी गार्ड) रा.ठि.रुम न.४१३, बि. नं. ७२, माहुलगाव,एस.आर.ए.प्रोजेक्ट, चेंबुर, मुंबई ४०००७४, मो.नं. ९५९४२६२६०७, आधारकार्ड नंबर ५०३३७१९९३७९२

-------------

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर सुमारे ०१ वर्षापासून पत्नी नामे यास्मीन वाल्मिकी व मुलांसह राहवयास आहे. मी आर्यन प्रायव्हेट सिक्युरिटीमध्ये सुमारे ०३ महिन्यापासून गार्डचे काम करत असून त्यावर मिळणा-या उत्पन्नावर आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. मी माझी सासू नामे श्रीमती शमा अहमद खान यांना भेटण्याकरीता त्यांच्या घरी गेलो असता माझे सासूने माझी ओळख त्यांचे परिचयाचे श्री.सतीश जाधव यांचेशी करून दिली व ते पैसे घेवून महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणुन नोकरी लावून देतात असे मला सांगितले.त्यावेळी मी त्यांचा व त्यांनी माझा मोबाईल नंबर घेतले होते व मला त्यांनी भेटण्यास सांगितले होते. मी सुरक्षा रक्षक म्हणुन नोकरी करित असल्याने मी त्यांना भेटलो नाही. परंतु ते मला भेटण्यास येत असे त्यावेळी ते मला तुला सफाई कामगाराची नोकरी पाहीजे असेल तर तुला तुझे कागदपत्रे मला दयावी लागतील असे सांगत असत तेंव्हा मी त्यांना तुम्हाला माझे कुटुंबियाचा निर्णय घेवुन सांगतो असे सांगितले.

त्यानुसार दिनांक १२/१२/२०२४ रोजी लोकसेवक सतीश जाधव यांनी माझे मोबाईल नंबरवरती कॉल केला असता त्यांनी पुन्हा मला सफाई कामगार म्हणुन नोकरी बाबत विचारले असता मी त्यास होकार दिला. त्यांनी मला भेटण्याकरीता अंधेरी पुर्व, रेल्वे स्टेशनच्या बाहेर बोलावले. त्यावेळी मी त्यास भेटण्याकरिता दुपारच्या सुमारास गेलो होतो. आमची भेट झाली त्यावेळी त्यांनी मला ते महानगरपालिका के वार्ड अंधेरी पश्चिम येथे घनकचरा विभागात सुपरवायझर म्हणून नोकरीस आहे असे सांगितले होते व मला कचरा उचलण्याच्या गाडीवर नोकरी लावून देतो असे म्हणून सुरवातीचे ०६ महिने टेम्परी व नंतर परमानंट नोकरी लावून देईल असे म्हणून त्यांनी माझ्याकडे माझे कागदपत्र व नोकरी लावून देण्यासाठी ३,०००००/- (तीन लाख रु.) दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी त्यांना मी एवढे पैसे देवू शकत नाही मी तुम्हाला अडीच लाख रुपये थोडे थोडे करुन देईल असे सांगितले असता श्री जाधव यांनी मला माझे कागदपत्र तयार करण्यासाठी रू. ५०,०००/- (पन्नास हजार रु.) व काम झाल्यानंतर बाकीचे पैसे दयावे लागतील असे सांगितले.

त्यानंतर सतिश जाधव हे मला वारंवार माझे मोबाईलवर कॉल करुन नोकरी संदर्भाने तुझे कागदपत्र व पैसे घेवून ये असे सांगत होते. ते मला नेहमी कॉल करत असल्याने मला त्यांचेवर संशय आला म्हणून मी त्यास पैसे देण्यास नकार दिला असता सतीश जाधव हे मला वारंवार फोन करुन नोकरी मिळवून देतो असे म्हणून पैश्याची मागणी केली. मला सतिश जाधव यास पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक ३१/१२/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे सतीश जाधव यांचेविरुध्द समक्ष तोंडी तक्रार केली.

माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता लाप्रवि, मुंबई विभागाचे पोलीस निरीक्षक पद्मावती कलाल व पोलीस निरीक्षक सुनिल कारोटे यांची नेमणुक करण्यात आली. त्यानंतर मला चांगल्याप्रकारे लिहीता वाचता येत नसल्याने पोलीस निरीक्षक कलाल यांनी माझी तक्रार मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत करुन मला मराठीत वाचून हिंदीतून समजावून सांगितली ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर असल्याची माझी खात्री झाल्याने मी त्यावर सही करुन पोलीस निरीक्षक कलाल यांचेकडे दिली.

त्यानंतर पोनि कलाल यांनी मला माझे तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून त्याकरीता करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती दिली व समजावून सांगितले. त्यानुसार आम्ही सर्व शासकीय वाहनाने शॉपर्स स्टॉप जवळील बस स्टॉप,अंधेरी (पश्चिम) या ठिकाणी आलो. त्यानंतर पो.नि. कलाल यांनी मला व माझेसोबत पडताळणी कारवाईकरीता येणारे पंच श्री. सपकाळ यांना पडताळणी दरम्यान करावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. कलाल यांनी त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून सुरू करून पोह गायकवाड यांनी सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. सपकाळ ऑटोरिक्षाने लोकसेवकाच्या महानगरपालिका के वार्ड, अंधेरी पश्चिम मुंबई येथील त्यांच्या कार्यालयात गेलो व सदर ठिकाणी लोकसेवक जाधव यांचेबाबत विचारणा केली असता ते सदर ठिकाणी लेबर म्हणून परमनंट नोकरीस असून त्यांचे कार्यालय अंधेरी पश्चिम येथील प्लॅटफॉर्म नं.०६ जवळ असल्याची माहिती मिळाली. त्यांनतर मी व पंच श्री. सपकाळ असे पायी चालत लोकसेवक श्री. सतिश जाधव यांचे कार्यालयात गेलो असता ते आम्हाला तेथे दिसून आले नाही म्हणून मी तेथे विचारणा केली असता ते दुपारी ०२.०० वा. कामावर येतील असे समजले. म्हणून मी व पंच सपकाळ असे पुन्हा सदर कार्यालयातून निघुन शासकिय वाहन उभे असलेल्या ठिकाणी पायी चालत परत आलो. त्यांनतर पोह गायकवाड यांनी माझे बनियानला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन पो.नि. कलाल यांचेकडे दिला व सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पो.नि. कलाल यांनी बंद केला. नमूद वेळी माझी व लोकसेवक जाधव यांची भेट झाली नाही म्हणून पोनि कलाल यांचे सुचनेप्रमाणे मी माझा मोबाईल क्रमांक ९५९४२६२६०७ वरून लोकसेवक जाधव यांचा मोबाईल क्रमांक ८८५०९१३८ वर फोन केला परंतू लोकसेवक जाधव यांनी फोन उचलला नाही. म्हणून पोनि कलाल यांचे सुचनेप्रमाणे मी पंच सपकाळ यांचेसोबत पुन्हा लोकसेवक जाधव यांची भेट घेण्याकरीता त्यांचे कार्यालयात गेलो परंतू ते कामावर आले

Scanned with OKEN Scanner

नसल्याचे आम्हाला समजले. म्हणून मी व पंच परत शासकीय वाहनाजवळ आलो व पोनि कलाल यांना माझी व लोकसेवक जाधव यांची भेट झाली नसल्याचे सांगितले. म्हणून पुढील कारवाईकरीता आम्ही लाप्रवि, मुंबई कार्यालयास परत जात असताना मला पुन्हा सतिश जाधव यांचा मिसकॉल आला त्यावेळी पो.नि. कलाल यांनी मला लोकसेवक जाधव यांना कॉल करण्यास सांगितले असता मी त्यांना कॉल केला त्यावर लोकसेवक जाधव यांनी मला दिनांक ०२/०१/२०२५ रोजी सकाळी ११ .०० - १२.०० वा चे सुमारास कागदपत्र घेवून येण्यास सांगितले. सदर संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आलेले आहे.

त्यानुसार दि. ०२/०१/२०२५ रोजी मी दुपारी ला.प्र.वि मुंबई कार्यालयास हजर झालो. पोनि कलाल यांनी मला माझे तक्रारीवर पडताळणी होणार असल्याचे सांगून आम्ही सर्व शासकीय वाहनाने शॉपर्स स्टॉप जवळील बस स्टॉप, अंधेरी (पश्चिम) या ठिकाणी आलो. त्यांनतर पोनि कलाल यानी त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पोह गायकवाड यानी माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पचं असे लोकसेवक यांनी सांगितलेल्या प्लॅटफॉर्म क्र. ०६ समोरील चौकी येथे लोकसेवकाची भेट घेणेकरीता गेलो. परंतू नमूद ठिकाणी लोकसेवक जाधव हे मिळून आले नाहीत. म्हणून लोकसेवक जाधव हे भारत रेस्टॉरन्ट, अंधेरी येथे भेटण्याची शक्यता असल्याने मी व पंच सपकाळ असे भारत रेस्टॉरन्ट, अंधेरी या ठिकाणी लोकसेवक जाधव यांची भेट घेण्याकरीता गेलो. सदर ठिकाणी लोकसेवक जाधव यांची व माझी भेट झाली त्यावेळी लोकसेवक जाधव यांनी माझेशी माझ्या नोकरीच्या कामाबाबत चर्चा केली. चर्चेदरम्यान लोकसेवक जाधव यांनी माझेकडे कागदपत्रांची मागणी केली व मी त्यांना कागदपत्रे दिली असता त्यांनी माझी कागदपत्रे स्विकारून मला त्याबाबत पोच दिली व त्यावर अजुन आवश्यक कागदपत्रांची नावे लिहुन सदर कागदपत्राची मागणी करून 'जितना भी तेरे पास वो बीस है ना, दे अभी कितना दे रहा है तु बोलेगा मै बीस हजार, जब तू पैसा देगा तेरे को काम पे चढाएगा हम लोग' असे बोलून लाचेच्या रकमेतील पहिला हप्ता रू. २००००/- रकमेची मागणी केली. त्यानुसार मी लोकसेवक जाधव यांना रकमेची जमवाजमव करणेकरीता काही वेळेची मागणी करून पुन्हा पथकाजवळ आलो. पोनि कलाल यांनी पोह गायकवाड यांचे मदतीने व्हॉइस रेकॉर्डर काढून बंद करून स्वतः जवळ ठेवला. त्यांनतर पोनि कलाल यांनी माझेकडे सापळा कारवाईकरीता आवश्यक रकमेची मागणी केली असता मी त्यांना माझे बचतीतील रू. २००००/- दिले.

त्यांनतर पोनि कलाल यांनी सापळा कारवाईचे आयोजन करून मला, पंच सपकाळ व पथकास सापळा कारवाईकरीताच्या सुचना देवून त्यांच्या ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून तो सुरू करून पोह गायकवाड यानी माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. सपकाळ असे लोकसेवक जाधव यांना भेटण्याकरीता अंधेरी पुर्व स्थानकाबाहेरील भारत रेस्टॉरन्ट येथे गेलो असता पोनि कलाल यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सदर रेस्टॉरन्ट व त्याचे आवारात सापळा पथकातील अंमलदार दबा धरून बसले होते. काही वेळातच लोकसेवक जाधव हे आले असता मी, पंच सपकाळ असे लोकसेवक जाधव यांचेसह भारत रेस्टॉरन्ट मध्ये जावून बसलो व कामाबाबत चर्चा करीत असताना लोकसेवक जाधव यांनी माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी केली त्यानुसार मी त्यांना लाचेच्या रकमेतील पहिला हप्ता रू. २००००/- दिला असता लोकसेवक जाधव यांनी सदर रक्कम मोजून त्यांचे पॅंटच्या चोरखिशात ठेवली त्यांनतर मी सापळा पथकास डोक्यावर हात फिरवून पूर्वनियोजित इशारा केल्यानतर दबा धरून बसलेल्या पथकामधील अंमलदारांनी लोकसेवक जाधव यांना रंगेहाथ ताब्यात घेतले.

तरी लोकसेवक सतिश पिट्या जाधव, ५५ वर्षे, धंदा- नोकरी, (मुकादम- मनपा के/वेस्ट वार्ड, अंधेरी मुंबई) यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करून, स्वतःच्या गैरफायदयाकरीता मला म.न.पा मुंबई चे के/वेस्ट वार्ड अंधेरी मुंबई येथे परमानंट सफाई कामगार या पदाची नोकरी मिळवून देतो म्हणून दि. १२/१२/२०२४ रोजी माझेकडे रू. ३०००००/- रकमेची मागणी करून कागदपत्र तयार करण्यासाठी रू. ५००००/- (पन्नास हजार रु.) व काम झाल्यानंतर रू. २५००००/- असे लाचेच्या रकमेची मागणी केली व दि. ०२/०१/२०२५ रोजी पहिला हप्ता म्हणून माझेकडून रू. २००००/- स्विकारताना त्यांना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले म्हणून माझी त्यांचेविरोधात कायदेशीर तक्रार आहे.

माझा जबाब मराठित संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मला मराठित वाचून हिंदीतून समजावून सांगितला, तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

PKalal
PI ACB

(पद्मावती कलाल)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

4060

DIRECTOR OF POLICE ANTI-CORRUPTION BUREAU MUMBAI

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य — लाचेची रक्कम 20,000/-
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता.वे व ठिकाणी यातील लोकसेवक यांनी "फि" यांना मनपा मध्ये कचरा उचलण्याच्या गाडीवर सफाई कामगार म्हणून नोकरी देतो असे सांगून, ०६ महिन्याने मनपा मध्ये परमनंट नोकरी होईल असे सांगितले. त्याकरिता लोकसेवक यांनी "फि" यांच्याकडे प्रथम कागदपत्रे तयार करण्याकरिता ५०,०००/- व नतर २,५०,०००/- असे एकूण ३,००,०००/- रकमेची लाचेची मागणी केली असता "फि" यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने "फि" यांनी लाप्रवि मुंबई कार्यालयात दि. ३१/१२/२४ रोजी समक्ष येवून लेखी तक्रार दिली. त्यानुसार दि. ०२/०१/२५ पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवकाने "फि" यांच्याकडे लाचेच्या रकमेचा पहिला हप्ता म्हणून रु. २०,०००/- लाचेच्या रकमेची मागणी करून ती स्विकारली असता लोकसेवकास रंगेहात पकडण्यात आले म्हणून भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ०७ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले, त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. ..............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................................................................. (3) Transferred to P.S ..................................................,
District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name पद्मावती कंडाळे
पदनाम Rank पोलिस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ............................

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner